Gokhale Education Society's

SMRK-BK-AK Mahila Mahavidyalaya, Nashik.

EVENT REPORT – DEPT. OF MARATHI

Name of the Programme	**Abhijat Marathi Bhasha Saptah (अभिजात मराठी भाषा सप्ताह)**
Day and Date	Saturday, 03th Oct. 2025 to Saturday 10 Oct. 2026
Organising Committee/Department (Mention Collaborating Agency)	**मराठी विभाग** **Dept. of Marathi**
Time	09.30 a.m to 1.00 p.m
Topic /Theme	**1) मराठी वाङ्मय उद्घाटन** **2) काव्यवाचन स्पर्धा** **3) मराठी चित्रपट रसास्वाद** **4) गटचर्चा – आम्ही दोघी चित्रपटातील स्त्रीविषयक जाणिवा**
Resource Person/s	1. डॉ. सौ. संध्या खेडेकर, प्राचार्या 2. सौ. वैशाली चौधरी 3. सौ. उज्ज्वला अहिरे
Students and staff attended the Programme	**Day 1 – 06/10/2026 – 43 students – 20 Staff** **Day 2 – 4 /10/2025 – 41 students – 04 Staff** **Day 3 – 7/10/2026 - 20 students – 3 Staff** **Day 4 – 10/10/2026 – 48 Students – 02 Staff**
Brief Summary	गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एस एम आर के महिला महाविद्यालयात मराठी विभागातर्फे मंगळवार दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी अभिजात मराठी भाषा सप्ताहाचा आरंभ झाला. यानिमित्ताने मराठी वाङ्मय मंडळाचे आणि काव्यवाचन स्पर्धेचे उद्घाटन प्राचार्या डॉ संध्या खेडेकर यांच्या हस्ते झाले. विद्यार्थिनींनी आपल्या भाषेची ताकद ओळखून तिचा संपूर्णपणे वापर केला पाहिजे कारण भाषा हीच आपल्या अस्तित्वाची ओळख असते असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी मराठी विषयाच्या अनेक विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण त्यांनी केले व विद्यार्थिनींचे कौतुक केले. मराठी विभाग प्रमुख प्रा प्रशांत अहिरे यांनी प्रास्ताविकात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा कसा मिळाला याचा आढावा घेत विभागाने आयोजित केलेल्या उपक्रमांत सर्व विद्यार्थिनींनी व स्टाफ ने सहभागी होण्यासाठी आवाहन केले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण कनिष्ठ महाविद्यालयाच्या सौ. वैशाली चौधरी आणि वरिष्ठ महाविद्यालयाच्या हिंदी विभागातील प्रा. उज्ज्वला अहिरे यांनी केले. निसर्ग आणि मैत्री या विषयावर एकूण ३५ हून अधिक विद्यार्थिनींनी आपल्या कविता सादर केल्या. या स्पर्धेत विजेत्या आणि सहभागी स्पर्धकांना दि. १५ सप्टेंबर रोजी आयोजित वाचन प्रेरणा दिनी गौरविण्यात येणार आहे.

	कवितेची निवड करताना घ्यावयाची काळजी तसेच अवांतर वाचन वाढविण्याबाबत विभाग प्रमुख प्रा प्रशांत अहिरे यांनी मार्गदर्शन केले. परीक्षक सौ. वैशाली चौधरी आणि प्रा. उज्ज्वला अहिरे यांनी मनोगत व्यक्त केले. कविता सादर करताना कोणत्या गोष्टींचे भान ठेवावे, भाषा कोणतीही असली तरी कवितेतील येणाऱ्या शब्दांचे उच्चारण कसे योग्य हवे यावर त्यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी मंचावर उपप्राचार्य डॉ नितीन सोनगीरकर, कला शाखा समन्वयक डॉ सुरेश कानडे, स्टाफ सेक्रेटरी डॉ सतीश धनवडे उपस्थित होते. मान्यवरांचा परिचय मराठी विभागातील प्रा. डॉ उज्ज्वला लांडगे यांनी करून दिला तर डॉ सायली आचार्य यांनी उपस्थितांविषयी कृतज्ञता व्यक्त केली. वाङ्मय मंडळ उद्घाटन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वैशाली मोरे, नगमा अन्सारी यांनी तर काव्यवाचन स्पर्धेचे सूत्र संचालन सौ. सुरेखा मोरे हिने केले. दि. ७ आॅक्टोबर रोजी अभ्यासक्रमात असलेला मराठी चित्रपट आम्ही दोघी दाखवण्यात आला. चित्रपट रसास्वादविषयी डॉ सायली आचार्य यांनी मार्गदर्शन केले. आम्ही दोघी चित्रपटातील स्त्री विषयक जाणिवा या विषयावर विद्यार्थिनींमध्ये गटचर्चा घेण्यात आली. भावना गवळी, शिवानी नरोटे, शिवानी जाधव या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्तपणे गटचर्चेत सहभाग नोंदवला. दि. १० आॅक्टोबर रोजी मराठी भाषा आणि साहित्य या विषयावर आधारित ४० गुणांची आॅनलाईन प्रश्नमंजुषा घेण्यात आली. यात स्टाफ आणि विद्यार्थिनी मिळून सुमारे ५० स्पर्धक सहभागी झाले. सहभागींना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात आले. सप्ताहाच्या यशस्वितेसाठी सई वाळे, सविता माघाडे, कल्पना मोरे, कोमल चारोस्कर, दीक्षा संसारे, मानसी सहाणे, अश्विनी अहिरे या विद्यार्थिनींनी योगदान दिले. याप्रसंगी ग्रंथपाल सौ. यामिनी गालापुरे, डॉ आक्षेपा कुलकर्णी, संगिता कांबळे, संध्या अदमानकर, सौ. मनिषा जोशी, हेमा देशमुख यांचेसह विविध विभागांचे प्रमुख, प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होते.

प्रा. प्रशांत अहिरे
मराठी विभागप्रमुख


डॉ. नितीन सोनगीरकर
उपप्राचार्य


डॉ. संध्या खेडेकर
प्राचार्या

मराठी विभाग आयोजित

अभिजात मराठी भाषा सप्ताह ऑक्टोबर २०२६

अभिजात मराठी भाषा सप्ताह ई – बॅनर





अभिजात भाषा सप्ताह विषयक महाविद्यालयातील फलक लेखन





दि. ६ ऑक्टोबर २०२६ रोजी अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तिपत्रकाचे अनावरण प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, उपप्राचार्य डॉ. नितीन सोनगीरकर, परीक्षक सौ. वैशाली चौधरी, प्रा. उज्ज्वला अहिरे आणि विभागासह इतर प्राध्यापक वृंद



काव्यवाचन स्पर्धेचे उद्घाटन करताना परीक्षक सौ. वैशाली चौधरी, प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर, स्टाफ सेक्रेटरी डॉ. सतीश धनवडे, परीक्षक प्रा. उज्ज्वला अहिरे व विभागातील स्टाफ

पुढारी

अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त आजपासून विविध उपक्रम

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

गोखले एज्युकेशन सोसायटीच्या एस.एम.आर.के. महिला महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्त दि. ६ ते १० ऑक्टोबरदरम्यान विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. गंगाउत्सवाने (दि. ६) सप्ताहाची ११ वा विद्यार्थिनींसाठी काव्यवाचन स्पर्धा होणार आहे.

'निसर्ग आणि मैत्री' या विषयांवर आधारित संकल्पित या स्वरचित कविता विद्यार्थिनी सादर करतील, स्पर्धेतील विजेत्यांना गौतम दि. १० ऑक्टोबर रोजी होणाऱ्या वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमात होणार



मराठी वाङ्मयाची समृद्ध परंपरा विद्यार्थ्यांकडे पोहोचावी आणि त्यांना साहित्याची गोडी लागावी, यासाठी महाविद्यालयात मराठी भाषा सप्ताहांतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन केले आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना साहित्य अभ्यासात करण्यासोबतच त्यांच्या सर्जनशीलतेलाही चालना मिळेल.

- सायली आचार्य प्राध्यापक, एस.एम.आर.के. महाविद्यालय

आहे. याच दिवशी प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांच्या हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन होणार आहे. सुरुवारी (दि. ७) सकाळी ९.३० वाजता पाटणकर सभागृहामध्ये अध्यक्षस्थानी समर्पक आलेल्या मराठी चित्रपट दाखविण्यात आहे. त्यानंतर चित्रपट रसास्वाद व मुक्त चर्चा यावर आयोजित केली आहे. शनिवारी (दि. ९०) मराठी भाषा व साहित्यावर आधारित अंतिम दिवस असून, या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थिनींनी सहभागी व्हावे, असे आवाहन प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर व मराठी विभागप्रमुख प्रा. प्रशांत अहिरे यांनी केले आहे.

Nashik Edition
Oct 06, 2026 Page No. 02
Powered by: erelego.com

पुढारी Anchor

आपल्या अस्तित्वाची ओळख म्हणजे भाषा : डॉ. खेडेकर

- मराठी विभागातर्फे 'अभिजात मराठी भाषा सप्ताह'



नाशिक : 'अभिजात मराठी भाषा सप्ताहा'निमित्ताने मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करताना शिक्षक व विद्यार्थिनी. (छाया : हेमंत भोसले)

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

विद्यार्थिनींनी आपल्या भाषेची ताकद ओळखून तिचा प्रभावीपणे वापर केला पाहिजे. भाषा हीच आपल्या अस्तित्वाची ओळख आहे, असे प्रतिपादन प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांनी केले. एसएमआरके महिला महाविद्यालयात मराठी विभागातर्फे अभिजात मराठी भाषा सप्ताहानिमित्ताने गंगाउत्सवी (दि. ६) मराठी वाङ्मय मंडळाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होत्या.

कार्यक्रमाचे उद्घाटन प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांच्या हस्ते झाले. सप्ताहनिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी काव्यवाचन स्पर्धा ठेण्यात आली. यावेळी विद्यार्थिनींनी तयार केलेल्या भित्तिपत्रकांचे अनावरण खेडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. विभागप्रमुख प्रा. प्रशांत अहिरे यांनी प्रास्ताविकात मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्याची प्रक्रिया व त्यामागील पार्श्वभूमीचा आढावा घेतला. सप्ताहानिमित्त आयोजित उपक्रमांत विद्यार्थिनी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे, असे आवाहन केले. काव्यवाचन स्पर्धेचे परीक्षण प्रा. वैशाली चौधरी, प्रा. उज्ज्वला अहिरे यांनी केले. 'निसर्ग' आणि 'मैत्री' या विषयांवर ३५ हून अधिक विद्यार्थिनींनी स्वरचित कविता सादर केल्या. स्पर्धेतील विजेत्या व सहभागी स्पर्धकांचा गौरव 'वाचन प्रेरणादिनी' करण्यात येणार आहे. यावेळी उपप्राचार्य डॉ. रितीन लोनगीरकर, डॉ. सुरेश वानखे, डॉ. सतीश घनवडे उपस्थित होते. डॉ. उज्ज्वला लांडगे यांनी परिचय करून दिला. वैशाली मोरे व मानसी आव्हाणी यांनी सूत्रसंचालन केले. सुरेखा मोरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. सायली आचार्य यांनी आभार मानले. कार्यक्रमासाठी सई वाडे, सविता माधाडे, कल्पना मोरे, प्रोमिला चारोस्कर, दीक्षा संसारे व मानसी सहाणे यांनी परिश्रम घेतले. उपप्राचार्या यामिनी गायापुरे, डॉ. आशलेषा कुलकर्णी, मनीषा जोशी, हेमा देशमुख उपस्थित होत्या.

अभिजात मराठी भाषा सप्ताहविषयक वृत्तांकन



वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी प्रास्ताविक करताना मराठी विभागप्रमुख प्रा. प्रशांत अहिरे



कार्यक्रमाच्या उद्घाटक व अध्यक्षा प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर यांचा सत्कार करताना प्रा. प्रशांत अहिरे



अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्राचार्या डॉ. संध्या खेडेकर



वाङ्मय मंडळ उद्घाटन प्रसंगी परीक्षकांचे स्वागत करताना डॉ. उज्ज्वला लांडगे



मराठी वाङ्मय मंडळ उद्घाटन कार्यक्रमात उपस्थितांचे आभार प्रकट करताना डॉ. सायली आचार्य



काव्यवाचन स्पर्धेत कविता सादर करताना विभागातील विद्यार्थिनी कु. वैशाली मोरे






काव्यवाचन स्पर्धेत कविता सादर करताना सविता माघाडे व नगमा अन्सारी



समारोप प्रसंगी मनोगत व्यक्त करताना परीक्षक सौ. वैशाली चौधरी



वाङ्मय मंडळ उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर आणि प्राध्यापक वृंद



दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी मराठी चित्रपट रसास्वादाविषयी माहिती देताना डॉ. सायली आचार्य





मराठी चित्रपट आम्ही दोघी रसास्वाद

प्रा. प्रशांत अहिरे	**डॉ. नितीन सोनगीरकर**	**डॉ. संध्या खेडेकर**
मराठी विभागप्रमुख	उपप्राचार्य	प्राचार्या